# Washim District Police

**Nature of Work** :- **Solving Sensatoinal Crime**

**Police Station** :- **Karanja**

**Date of Good Work done** :- **26/09/2020**

**Brief of the work done :-**

धारदार शास्त्राने महिलेची हत्या करणाऱ्या आरोपीस अमरावतीतून अटक करण्यात आली. दि. २५/०९/२०२०

## धारदार शस्त्राने महिलेची हत्या; आरोपी पोलीसांच्या ताब्यात

**कारंजा** ■ तालुका प्रतिनिधी

धारदार शस्त्राने वार करून एका महिलेची हत्या केल्याची घटना २१ सप्टेंबर रोजी रात्री ७.३० वाजताच्या दरम्यान कारंजा शहरातील गौतम नगरात घडली. सदर प्रकरणी कारंजा शहर पोलीसांनी आरोपीला अमरावती येथून ताब्यात घेऊन कारंजा न्यायालयापुढे हजर केले असता, आरोपीला २५ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

- कारंजा शहरातील गौतम नगरातील घटना
- २५ सप्टेंबरपर्यंत पोलीसकोठडी

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, कारंजा शहरातील गौतम नगरात अरूण शिरसाट आपली आई बिल्कीस सोबत वास्तव्यास आहे. अशातच २१ सप्टेंबर रोजी आरोपी अमोल रामदास खंडारे हा अरूण शिरसाट यांच्या घरी आला असता त्याची पत्नी काजल ही अरूण शिरसाटच्या घरी आढळून आली.

काजल ही १४ सप्टेंबर पासून आरोपीच्या घरून बेपत्ता होती. आपल्या पत्नीला अरूण शिरसाटच्या घरी पाहताच आरोपीचा पारा चढला व त्याने आपल्या सोबत आणलेल्या धारदार शस्त्राने बिलकिस, अरूण व काजल या तिघांवरही हल्ला चढविला. यात अरूण शिरसाटची आई बिलकीस ही गंभीर जखमी झाली. जखमी अवस्थेत तीला प्रथम कारंजा ग्रामीण रूग्णालय व त्यानंतर अनुक्रमे वाशिम, अकोला व नागपूर येथे उपचारार्थ पाठविण्यात आले; परंतु नागपूर येथे जात असतांना वाटेतच बिलकीसचा मृत्यू झाला.

अशा आशयाच्या अरूण सुरेश शिरसाट रा. गौतमनगर कारंजा यांच्या फिर्यादीवरून आरोपी अमोल रामदास खंडारे रा. जामठी बु. ता. मुर्तिजापूर जि. अकोला याच्याविरूध्द कारंजा शहर पोलीसांनी भादंविच्या कलम ३०७ व ३०२ नुसार गुन्हा दाखल केला.

### आरोपीस अमरावतीतून अटक

ठाणेदार सतीश पाटील यांच्या मार्गदर्शनात गतीने तपासचक्र फिरवित आरोपी अमोल खंडारे याला पोलीस उपनिरीक्षक गणेश कायंदे यांनी अमरावती येथून ताब्यात घेतले. त्याला दुसऱ्या दिवशी कारंजा न्यायालयापुढे हजर केले असता, न्यायालयाने २५ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. घटनेचा अधिक तपास ठाणेदार सतीश पाटील यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक गणेश कायंदे करीत असून, उपरोक्त प्रकरणाला अनैतिक संबंधाची किनार असल्याची चर्चा शहरात ऐकावयास मिळाली

ePaper देशोन्नती
Fri, 25 September 2020
https://deshonnati.digitaledition.in/c/55210968